# लग्नशुद्धी.. अर्थात् जन्मवेळ शोधन

**श्री. सुभाष एकतारे,** ज्योतिषविशारद, नक्षत्रशिरोमणी
५८/७०४, वसंत औदुंबर को-ऑप. सोसायटी, वसंत विहार, ठाणे-४०० ६१०.
फोन : ०९३२४३४६२४८. ई-मेल : subhash_ektare@yahoo.com

कोणत्याही ज्योतिष पद्धतीत, मग ती वेदिक असो किंवा पाश्चिमात्य असो किंवा कृष्णमूर्ती पद्धत असो जन्मवेळेच्या अचूकतेवर फलादेश अवलंबून असतो. आजकाल जवळपास सर्वच ठिकाणी वेळ दाखविण्यासाठी घड्याळे उपलब्ध असतात. त्यामुळे जन्मवेळ बऱ्याच प्रमाणात अचूक नोंदली जाते. बऱ्याच प्रमाणात म्हणण्याचे कारण उपस्थित लोकांची घड्याळे कधी एक वेळ दाखवत नाही. हॉस्पिटलमधील डॉक्टर किंवा नर्स यांचे लक्ष आधी जन्मलेल्या बाळाकडे असते व नंतर वेळ पाहिली जाते. तेव्हा वेळेमध्ये थोडाफार फरक पडण्याची शक्यता असते. अशा थोड्याशा फरकाने देखील भावारंभाचे उपनक्षत्रस्वामी बदलण्याची शक्यता असते आणि परिणामत: फलादेश चुकू शकतात. ज्योतिषशास्त्रात अशा अचूक जन्मवेळा शोधून काढण्याच्या अनेक पद्धती आहेत. अशा सर्व पद्धतीत कृष्णमूर्ती पद्धत सगळ्यात अचूक आहे.

ही पद्धत कृष्णमूर्तींच्या रुलिंग प्लॅनेटच्या अलौकिक शोधावर आधारलेली आहे. यात के.पी. च्या मूळ तत्त्वाचा म्हणजे जन्मवेळेच्या लग्नाचे आणि रुलिंग मधील चंद्राचे रुलिंग प्लॅनेटस् व जन्मवेळेच्या चंद्राचे आणि रुलिंग मधील लग्नाचे रुलिंग प्लॅनेटस् हे एक असतात याचा उपयोग केलेला आहे. परंतु असे आढळून आले आहे की, बरेचसे ज्योतिषी वरीलपैकी पहिल्या भागाचाच उपयोग करतात. कारण आपल्याला लग्नाच्या अचूक अंश-कला काढायच्या आहेत चंद्राच्या नव्हे असा त्यांचा ग्रह झाला असावा. माझ्या मते हे बरोबर नाही. दोन्ही भागांचा तारतम्याने विचार करायला हवा. त्याची कारणमीमांसा पुढे देत आहे.

चंद्र हा एक रास पार करायला सव्वा दोन दिवस घेतो तर तीच रास लग्न हे केवळ दोन तासांत (अंदाजे) पार करते. याचाच अर्थ लग्नाची गती ही चंद्राच्या गतीपेक्षा २४ ते २५ पट जास्त आहे. आता रुलिंग मधील चंद्रावरून त्याच्यापेक्षा २५ पट गतिमान लग्नाचे अंश-कला निश्चित करणे कितपत योग्य आहे यावर विचार करण्याची गरज आहे. माझ्या मते तरी रुलिंग लग्नावरून जन्म चंद्राच्या अंश-कला आधी बरोबर कराव्या आणि नंतर त्यावेळचे लग्न रुलिंग चंद्रावरून बरोबर आहे की नाही ते ठरवावे. अशाप्रकारे एक किंवा दोन ट्रायलमध्ये आपण अचूक जन्मवेळ शोधून काढू शकू. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आपण काही उदाहरणे पाहू.

### उदाहरण नं. १

जन्मतारीख : ४-२-१९७७

जन्मगाव : बेगमपेठ, हैद्राबाद (७८ पू. २७ २२ : १७ उ. २६ २७) जन्मवेळ अंदाजे १६.०० तास ते १६.२० तास (दुपारी ४ ते ४.२०)

लग्नशुद्धी तारीख : २५-९-२००७. स्थळ : १२१ प. ५७ १५ : ३७ उ. २१ १५. वेळ : १०-४५-५० सकाळी. रुलिंग लग्न : २०३ अंश





४२ कला १७ विकला. शुक्र-गुरु-शनी-गुरु. रुलिंग चंद्र. ३२३ अंश २६ कला ५५ विकला. शनि-गुरु-शनि-राहू. जन्म लग्न : काढायचे आहे. जन्म चंद्र : दिलेल्या अंदाजे वेळेला चंद्र कर्क राशीत आश्लेषा नक्षत्रात होता.

येथे जन्मतारीख पक्की असल्यामुळे चंद्राची कर्क रास व आश्लेषा नक्षत्र आहे हे नक्की झाले. आता उपनक्षत्रस्वामी नक्की करायच. त्यासाठी प्रथम आश्लेषा नक्षत्राची व्याप्ती काढू. आश्लेषा नक्षत्र ४-२-१९७७ रोजी पहाटे ००-११-११ (म्हणजेच ३-२-१९७७ ला रात्री १२-११-११ वाजता) सुरु होते ते ५-२-१९७७ रोजी पहाटे ००-०९-०६ पर्यंत (म्हणजेच ४-२-१९७७ ला रात्री १२-०९-०६ पर्यंत) आहे. म्हणजे त्याची एकूण व्याप्ती २३ तास ५७ मिनिटे ५५ सेकंद इतकी आहे. विंशोत्तरी प्रमाणात याचे ९ भाग करून प्रत्येक सबची व्याप्ती काढू.

| सब | सबची सुरुवात तास : मिनिट : सेकंद | सबची व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | सबचा शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| बुध | ००-११-११ | ०३-२३-४२ | ०३-३४-५३ |
| केतू | ०३-३४-५३ | ०१-२३-५३ | ०४-५८-४६ |
| शुक्र | ०४-५८-४६ | ०३-५९-३९ | ०८-५८-२५ |
| रवी | ०८-५८-२५ | ०१-११-५४ | १०-१०-१९ |
| चंद्र | १०-१०-१९ | ०१-५९-५० | १२-१०-०९ |
| मंगळ | १२-१०-०९ | ०१-२३-५३ | १३-३४-०२ |
| राहू | १३-३४-०२ | ०३-३५-४१ | १७-०९-४३ |
| गुरु | १७-०९-४३ | ०३-११-४३ | २०-२१-२६ |
| शनी | २०-२१-२६ | ०३-४७-४० | २४-०९-०६ |

आपली अंदाजे जन्मवेळ राहू सब मध्ये देते. राहू सबचे सबसब खालील कोष्टकात दिले आहे.

| सब सब | सबची सुरुवात तास : मिनिट : सेकंद | सबची व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | सबचा शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| राहू | १३-३४-०२ | ००-३२-२१ | १४-०६-२३ |
| गुरु | १४-०६-२३ | ००-२८-४५ | १४-३५-०८ |
| शनी | १४-३५-०८ | ००-३४-०९ | १५-०९-१७ |
| बुध | १५-०९-१७ | ००-३०-३३ | १५-३९-५० |
| केतू | १५-३९-५० | ००-१२-३५ | १५-५२-२५ |
| शुक्र | १५-५२-२५ | ००-३५-३७ | १६-२८-२२ |
| रवी | १६-२८-२२ | ००-१०-४७ | १६-३९-०९ |
| चंद्र | १६-३९-०९ | ००-१७-५८ | १६-५७-०७ |
| मंगळ | १६-५७-०७ | ००-१२-३५ | १७-०९-४२ |

आपली अंदाजे जन्मवेळ शुक्र सबसब मध्ये येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रा.स्वा. | न.स्वा. | सब उप. | सबसब |
| | | | न.स्वा. | उपउप |
| याप्रमाणे | | | | न.स्वा. |
| जन्मवेळेचा चंद्र | चंद्र | बुध | राहू | शुक्र |

असा नक्की झाला. परंतु ह्या सबसबची व्याप्ती ३५ मि. ५७ से. आहे. हा कालावधी बराच मोठा असल्यामुळे आपणाला शुक्र सबसबचे सबसबसब पर्यंत ९ भाग करावे लागतील. ते पुढीलप्रमाणे :

| सबसबसब | सबसबसबची सुरुवात तास : मि. : से. | सबसबसबची व्याप्ती तास : मि. : से. | सबसबसबचा शेवट तास : मि. : से. |
|---|---|---|---|
| शुक्र | १५-५२-२५ | ००-०६-०० | १५-५८-२५ |
| रवी | १५-५८-२५ | ००-०१-४८ | १६-००-१३ |
| चंद्र | १६-००-१३ | ००-०३-०० | १६-०३-१३ |
| मंगळ | १६-०३-१३ | ००-०२-०६ | १६-०५-१९ |
| राहू | १६-०५-१९ | ००-०५-२४ | १६-१०-४३ |
| गुरु | १६-१०-४३ | ००-०४-४८ | १६-१५-३१ |
| शनी | १६-१५-३१ | ००-०५-४२ | १६-२१-१३ |
| बुध | १६-२१-१३ | ००-०५-०६ | १६-२६-१९ |
| केतू | १६-२६-१९ | ००-०२-०६ | १६-२८-२५ |

याप्रमाणे आपल्याला हवी असलेली अंदाजे जन्मवेळ (१६-००-०० ते १६-२०-००) चंद्र, मंगळ, राहू, गुरु आणि शनी यांच्या सब सब सब मध्ये येते. आता यातील कोणता सब सब सब निवडायचा हे ठरविण्यासाठी रुलिंग लग्न पहावे लागेल. ह्यात गुरु हा नक्षत्रस्वामी आणि सब सब स्वामी आहे. म्हणून तो सगळ्यात बलवान आहे. तेव्हा त्याचा सब सब सब घ्यावा लागेल. हा सब सब सब १६-१०-४३ पासून १६-१५-३१ पर्यंत आहे. म्हणजे जन्मवेळ १६-१०-४३ ते १६-१५-३१ यात असायला पाहिजे. आता या दोन्ही वेळाचे लग्न काय आहे ते पाहू.

१६-१०-४३ वेळेचे लग्न ८५-२६-३९ बुध-गुरु-बुध-गुरु असे आहे व
१६-१५-३१ वेळेचे लग्न ८६-३१-०५ बुध-गुरु-केतू-बुध असे आहे.

वरील दोन्ही लग्ने पाहता बुध राशी व गुरु नक्षत्र फायनल झाले. फक्त सब व सब सब निश्चित करायचे राहतात. ते रुलिंग चंद्रावरून निश्चित करावे लागतील. रुलिंग चंद्रात शनी हा राशी स्वामी व सब असा दोनदा आला आहे. शिवाय शनी व केतू युती (२ अंश ३९ कला ४९ विकला) आहे. म्हणून लग्नाचा सब केतू आणि सब सब शनी घ्यावा लागेल.

म्हणजे शेवटी लग्न ८६ अंश २३ कला २ विकला - बुध-गुरु-केतू-शनी असे निश्चित झाले. यात शनी सबसब १६-१४-३९ ते १६-१५-११ वाजेपर्यंत आहे. याचा मध्य घेतला तर जन्मवेळ १६-४५-५५ अशी येईल.

अशाप्रकारे १६-१४-५५ अशी जन्मवेळ निश्चिती झाली.

उदाहरण नं. २ : (अंदाजे जन्मवेळ - दोन तासाचे अंतर)

जन्मतारीख : २५ सप्टेंबर १९४२ (वॉर टाईम) जन्मवेळ : पहाटे १ ते ३ दरम्यान
जन्मस्थळ : ७५ पूर्व ३४, २१ उत्तर ०१.

हे काम २२ एप्रिल २००५ रोजी दुपारी १ वा. १७ मिनिटांनी नागपूर (७९ पूर्व ०६ : २१ उत्तर ०९) येथे केले. त्यावेळेचे लग्न (रुलिंग लग्न) कर्क २५-५८-२४ चंद्र-बुध-राहू-चंद्र
त्यावेळेचा चंद्र (रुलिंग चंद्र) कन्या १२-४५-२१ बुध-चंद्र-राहू-शनी

तारीख पक्की असल्यामुळे पहाटे १.०० ते ३.०० दरम्यान चंद्राची स्थिती पाहू.





चंद्र १.०० वाजता मीन १०-०९-१९ गुरु-शनी-शुक्र-बुध
चंद्र ३.०० वाजता मीन ११-१६-२७ गुरु-शनी-चंद्र-राहू

वरील चंद्राच्या स्थितीवरून जातकाची रास मीन व नक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे हे नक्की झाले. त्यामुळे आता आपले काम चंद्राचा सब आणि सबसब काढण्यापुरते मर्यादित झाले आहे. तेव्हा पंचांगावरून उत्तराभाद्रपदा नक्षत्राची व्याप्ती काढावी लागेल. चंद्र उत्तराभाद्रपदा नक्षत्रात २४ सप्टेंबर १९४२ रोजी दुपारी १२-५२-२० ला जातो आणि २५ सप्टेंबर १९४२ रोजी दुपारी १२-४१-१७ ला पुढील नक्षत्रात जातो. याचा अर्थ उत्तराभाद्रपदा नक्षत्राची व्याप्ती २३ तास ४८ मिनिटे ५७ सेकंद इतकी आहे. ह्यातील प्रत्येक सबची व्याप्ती काढण्यासाठी ही वेळ विंशोत्तरी दशेच्या प्रमाणात विभागावी लागेल. ते खालील कोष्टकात दिले आहे.

| ग्रहाचा सब | सुरुवात तास : मिनिट : सेकंद | व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| शनी | १२-५२-२० २४ सप्टेंबर १९४२ | ०३-४६-१५ | १६-३८-३५ |
| बुध | १६-३८-३५ | ०३-२२-२६ | २०-०१-०१ |
| केतू | २०-०१-०१ | ०१-२३-२१ | २१-२४-२२ |
| शुक्र | २१-२४-२२ | ०३-५८-१० | २५-२२-३२ म्हणजेच ०१-२२-३२ २५ सप्टेंबर १९४२ |
| रवि | ०१-२२-३२ २५ सप्टेंबर ९.४२ | ०१-११-२७ | ०२-३३-५९ |
| चंद्र | ०२-३३-५९ | ०१-५९-०५ | ०४-३३-०४ |
| मंगळ | ०४-३३-०४ | ०१-२३-२१ | ०५-५६-२५ |
| राहू | ०५-५६-२५ | ०३-३४-२१ | ०९-३०-४६ |
| गुरु | ०९-३०-४६ | ०३-१०-३१ | १२-४१-१७ |

दिलेली अंदाजे जन्मवेळ ही शुक्र, रवि व चंद्र या तीन सबमध्ये आढळून येते. यातील कोणता सब घ्यायचा ह्याचे मार्गदर्शन रुलिंग लग्नावरून मिळेल. रुलिंग लग्नात चंद्र हा राशीस्वामी आणि सबसब असा दोनदा आला असून शुक्र व रविची उपस्थिती नाही. म्हणजे चंद्राचा सब निश्चित झाला. ह्या सबची व्याप्ती अंदाजे २ तास असल्यामुळे आपल्याला त्याची विभागणी सबसबमध्ये करावी लागेल. ती खालीलप्रमाणे :

| सबचा सब सब | सुरुवात तास : मिनिट : सेकंद | व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| चंद्र | ०२-३३-५९ | ००-०९-५५ | ०२-४३-५४ |
| मंगळ | ०२-४३-५४ | ००-०६-५७ | ०२-५०-५१ |
| राहू | ०२-५०-५१ | ००-१७-५२ | ०३-०८-४३ |

येथे राहूचा सबसब अंदाजे वेळेनंतर संपत असल्यामुळे सबसब विभागणी येथेच थांबविली आहे. या तीन सबसब पैकी चंद्र आधीच सब मधून निवडला आहे. रुलिंग लग्नात मंगळ नाही म्हणून हा सबसब सोडावा लागेल. आता राहिला राहू सबसब. राहू हा रुलिंग लग्नाचा सब असल्यामुळे हा सबसब निश्चित करायला हरकत नाही.

म्हणजेच नाताळ चंद्राचे रुलिंग ग्रह गुरु-शनि-चंद्र-राहू असे निश्चित झाले.

वरील कोष्टकावरून आपल्याला असे दिसून येईल की राहू सबसब ०२-५०-५१ ते ०३-०८-४३ पर्यंत आहे. याचाच अर्थ असा की अंदाजे जन्मवेळेतील २ तासाचा फरक आपण १८ मिनिटांवर आणला. ह्या दोन्ही वेळेस लग्न काय केले ते पाहू.

०२-५०-५१ ला लग्नाचे रुलिंग ग्रह येतात. चंद्र-शनि-बुध-गुरु
०३-०८-४३ ला लग्नाचे रुलिंग ग्रह येतात. चंद्र-शनि-रवि-बुध

वरील दोन्ही पर्यायातील राशीस्वामी चंद्र व नक्षत्रस्वामी शनि आपण आधीच नक्की केले आहेत. आता सब आणि सबसब ठरवायचे आहेत. त्याकरिता रुलिंग चंद्राची मदत घ्यावी लागेल. रुलिंग चंद्रामध्ये रविची उपस्थिती नाही. पण बुध आहे म्हणून बुधाचा सब निश्चित करावा लागेल. आता राहिला सबसब. रुलिंगमध्ये गुरु नाही पण राहू व शनि आहेत. परंतु राहू हा नोड असल्यामुळे शनिपेक्षा बलवान आहे. म्हणून राहूचा सबसब निश्चित करणे योग्य ठरेल.

अशाप्रकारे आपण चंद्र-शनि-बुध-राहू असे लग्न निश्चित केले. हा राहूचा सबसब ०२-४९-२८ ला सुरु होतो आणि ०२-५०-४४ ला संपतो. म्हणजे २ तासाचा अवधी आता १ मिनिट १६ सेकंदांपर्यंत कमी केला. याचा मध्य घेतल्यास बरोबर जन्मवेळ सकाळी ०२-५०-०६ येते.

उदाहरण नं. ३ :

जन्मतारीख : माहीत नाही परंतु जन्म १९४४ साली झाला. त्यादिवशी रमा एकादशी होती.
जन्मवेळ : रात्री उशीराचा जन्म. जन्मगाव : ७३ पूर्व ५५ : १८ उत्तर ५१.

लग्नशुद्धीचे काम २२ मार्च २००५ रोजी रात्री ८.४३ वाजता ठाणे (७२ पूर्व ५८ : १९ उत्तर १२) येथे केले.

त्यावेळेचे रुलिंग लग्न तूळ ०५-२६-५२ शुक्र-मंगळ-रवि-शुक्र
त्यावेळेचा रुलिंग चंद्र धनु ०५-५६-१९ गुरु-केतू-राहू-गुरु
राहू मीनेत रविच्या युतीत होता. तर केतू बुधाच्या कन्या राशीत होता.

रमा एकादशी म्हणजे अश्विन कृष्ण एकादशी. १९४४ सालच्या पंचांगाप्रमाणे ही एकादशी ११ ऑक्टोबर १९४४ रोजी रात्री ११-५२-५५ ला सुरु होते आणि १३ ऑक्टोबर १९४४ रोजी पहाटे ०२-१९-१२ ला संपते. जन्मवेळ रात्री उशीराची असल्यामुळे १३ तारीख सोडून द्यावी लागेल. याचाच अर्थ जन्म ११ किंवा १२ तारखेचा असणार.

११ ऑक्टोबरला रात्री एकादशी सुरु होतेवेळी चंद्र बुधाच्या आश्लेषा नक्षत्रात होता. पण रुलिंग लग्नात बुध नाही. त्यामुळे जन्म ११ तारखेला असणार नाही. १२ ऑक्टोबरला चंद्र केतूच्या मघा नक्षत्रात होता. परंतु रुलिंग लग्नात केतू देखील नाही. अशावेळी रुलिंग लग्नाच्या सबची मदत घ्यावी लागेल. हा सब रवि असून तो गुरुच्या राशीत शनिच्या नक्षत्रात केतूच्या सबमध्ये आहे. इथे मघा नक्षत्रस्वामी केतूची उपस्थिती आली व तो जन्म १२ ऑक्टोबर १९४४ लग्न झाला असल्याची ग्वाही देतो.

आतापर्यंत आपण जन्म चंद्र सिंह राशीत व मघा नक्षत्रात असल्याचे निश्चित केले. आता चंद्राचा सब आणि सबसब निश्चितीचे काम राहिले. चंद्र मघा नक्षत्रात सकाळी ०९-२३-२१ ला जातो व दुसऱ्या दिवशी





दुपारी १२-२३-१२ ला मघातून पूर्वा नक्षत्रात जातो. म्हणजे मघा नक्षत्राची व्याप्ती २६ तास ५९ मिनिटे ५१ सेकंद इतकी आहे. याची विंशोत्तरी दशेच्या प्रमाणात विभागणी करून प्रत्येक सबचा कालावधी काढावा लागेल. तो खालील कोष्टकात दिला आहे.

| ग्रहाचा सब | सुरुवात तास : मिनिट : सेकंद | व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| केतू | ०९-२३-२१ | ०१-३४-२९ | १०-५७-५० |
| शुक्र | १०-५७-५० | ०४-२९-५९ | १५-२७-०९ |
| रवि | १५-२७-०९ | ०१-२१-०० | १६-४८-०९ |
| चंद्र | १६-४८-०९ | ०२-१४-५९ | १९-०३-०८ |
| मंगळ | १९-०३-०८ | ०१-३४-२९ | २०-३७-३७ |
| राहू | २०-३७-३७ | ०४-०२-५९ | २४-३९-३६ |

राहूचा सब १३ तारखेच्या सकाळपर्यंत असल्यामुळे त्यापुढील सबची व्याप्ती काढण्याची गरज नाही. दिलेली जन्मवेळ ही राहूच्या सबमध्ये येते. पण रुलिंग लग्नात राहू नाही. परंतु त्या दिवशी राहू रविच्या युतीत होता आणि रवि रुलिंग लग्नाचा सब आहे. अशा प्रकारे राहूचा सब निश्चित झाला. राहूच्या सबची व्याप्ती जवळपास ४ तासाची आहे. या काळात मेष, वृषभ व मिथुन अशी तीन लग्ने उदित होतात. परंतु मंगळ आणि शुक्र रुलिंग चंद्रात नाहीत व उरलेल्या बुधाचा प्रतिनिधी केतू (केतू मिथुनेत असल्यामुळे) रुलिंग चंद्राचा नक्षत्रस्वामी असल्यामुळे मिथुन लग्न निश्चित करायला हरकत नसावी. हे मिथुन लग्न रात्री ११-०५-३४ ला उदित होत असल्यामुळे जन्म रात्री ११ ते १२ चे दरम्यान झाला असावा. पण आपल्याला अचूक जन्मवेळ काढायची असल्याने राहूचा सब आपण सबसब मध्ये विभागित करू. त्यासाठी खालील कोष्टक पहा :

| ग्रहाचा सब | सुरुवात तास : मिनिट : सेकंद | व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| राहू | २०-३७-३७ | ००-३६-२७ | २१-१४-०४ |
| गुरु | २१-१४-०४ | ००-३२-२४ | २१-४६-२८ |
| शनि | २१-४६-२८ | ००-३८-२८ | २२-२४-५६ |
| बुध | २२-२४-५६ | ००-३४-२५ | २२-५९-२१ |
| केतू | २२-५९-२१ | ००-१४-१० | २३-१३-३१ |
| शुक्र | २३-१३-३१ | ००-४०-३० | २३-५४-०१ |
| रवि | २३-५४-०१ | ००-१२-०९ | २४-०६-१० |

वर पाहिल्याप्रमाणे मिथुन लग्न केतू, शुक्र आणि रवि यांच्या सबसब मध्ये येते. पैकी केतू रुलिंग चंद्रात नाही व रवि सब म्हणून निश्चित केला. तेव्हा राहिलेल्या शुक्राचाच सबसब असायला हवा. तर जन्मवेळचा चंद्र (रुलिंग लग्नावरून) रवि-केतू-राहू-शुक्र असा निश्चित केला.

आता लग्न निश्चित करायचे. त्यासाठी शुक्राच्या सबसबच्या सुरुवातीच्या आणि समाप्तीच्या वेळचे लग्न पाहू.

२३-१३-३१ या वेळेचे लग्न मिथुन ०१-५१-५६ बुध-मंगळ-बुध-शनि
२३-५४-०१ या वेळचे लग्न मिथुन ११-११-४९ बुध-राहू-शनि-केतू

रुलिंग चंद्राचे रुलिंग ग्रह गुरु-केतू-राहू-गुरु असे आहेत. यात मंगळ उपस्थित नाही. पण राहूचा सब आहे. म्हणून लग्नाचा नक्षत्रस्वामी राहू धरला. रुलिंग चंद्रामधील गुरु आणि केतूचा वापर करायचा राहिला आहे. तेव्हा गुरु सब व केतू सबसब घ्यायला हरकत नसावी.

शेवटी जन्मवेळेचे लग्न बुध-राहू-गुरु-केतू असे निश्चित झाले. यातील केतू सबसब २३-४६-१८ ला सुरु होतो व २३-४६-४५ ला समाप्त होतो. याचा मध्य अचूक जन्मवेळ धरायला हरकत नसावी.

अचूक जन्मतारीख : १२ ऑक्टोबर १९४४. अचूक जन्मवेळ : ११-४६-३२ रात्री.

उदाहरण नं. ४ (तारीख माहित नाही. पण अंदाजे वेळ माहित आहे.)

जन्मतारीख : नक्की माहित नाही. पण डिसेंबर १९४४ मध्ये जन्म.

जन्मवेळ : अंदाजे दुपारी १२ वाजता.

जन्मस्थळ : ८१ अंश ४४ कला ८ विकला पूर्व. १६ अंश ३० कला ४६ विकला उत्तर.

अधिक माहिती : जन्म मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदा व नक्षत्र मूळ (चरण ४) असावे.

जन्मशुद्धीचे काम ४ डिसेंबर २००७ रोजी २१ : ३९ : २६ वाजता १२१ पश्चिम ५७.१५, ३७ उत्तर २१.१५ टाईम झोन ८-००.

| | | | |
|---|---|---|---|
| रुलिंग लग्न | कर्क | २२-४४-५२ | चंद्र-बुध-चंद्र-शनि |
| रुलिंग चंद्र कन्या | | २९-४७-२६ | बुध-मंगळ-शनि-गुरु |
| राहू | | | शनि-राहू-राहू-बुध |
| केतू | | | रवि-केतू-गुरु-गुरु |

त्यावेळेचे रुलिंग ग्रह असे :

| | | |
|---|---|---|
| लग्न नक्षत्र | आश्लेषा | स्वामी बुध |
| लग्न | कर्क | स्वामी चंद्र |
| चंद्र नक्षत्र | चित्रा | स्वामी मंगळ (वक्री) |
| चंद्र राशी | कन्या | स्वामी बुध |
| दिवस | मंगळवार | स्वामी मंगळ (वक्री) |

१९४७ सालाचे पंचांग पाहिल्यास असे आढळून येईल की, मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदा १२-१२-१९४७ रोजी १८-२३-१२ वाजता सुरु होते आणि १३-१२-१९४७ रोजी २०-१०-३५ वाजता संपते. शिवाय चंद्र मूळ नक्षत्रात १२/१३ च्या रात्री ००-५९-५१ वाजता जातो. जातकाचा जन्म मूळ नक्षत्रात झाला असल्याने जन्मतारीख १२-१२-१९४७ असणे शक्य नाही. तसेच मूळ नक्षत्राचा चतुर्थ चरण हा द्वितीया तिथी लागल्यावर येतो म्हणून जन्म चतुर्थ चरणात न होता आधी झाला असावा.

चंद्र राशी धनु आणि नक्षत्र मूळ निश्चित झाल्यावर चंद्राचा सब आणि सबसब निश्चितीचे काम राहिले. ते रुलिंग लग्नावरून करू. त्यासाठी प्रथम मूळ नक्षत्राची व्याप्ती काढू. चंद्र मूळ नक्षत्रात १२/१३ च्या रात्री ००-५९-५१ ते १३/१४ च्या रात्री ०३-२०-४९ पर्यंत आहे. याचा अर्थ मूळ नक्षत्राची व्याप्ती २६ तास





२० मिनिटे ५८ सेकंद इतकी झाली. याची विंशोत्तरीच्या प्रमाणात विभागणी केल्यास प्रत्येक सबची सुरुवात आणि शेवट केव्हा झाला हे काढता येईल. त्यासाठी खालील कोष्टक पाहू.

| सब | सबची सुरुवात तास : मिनिट : सेकंद | सबची व्याप्ती तास : मिनिट : सेकंद | सबचा शेवट तास : मिनिट : सेकंद |
|---|---|---|---|
| केतू | ००-५९-५१ १३-१२-१९४७ रोजी | ०१-३२-१३ | ०२-३२-०४ |
| शुक्र | ०२-३२-०४ | ०४-२३-३० | ०६-५५-३४ |
| रवि | ०६-५५-३४ | ०१-१९-०३ | ०८-१४-३७ |
| चंद्र | ०८-१४-३७ | ०२-११-४५ | १०-२६-२२ |
| मंगळ | १०-२६-२२ | ०१-३२-१३ | ११-५८-३५ |
| राहू | ११-५८-३५ | ०३-५७-०९ | १५-५५-४४ |
| गुरु | १५-५५-४४ | ०३-३०-४८ | १९-२६-३२ |
| शनी | १९-२६-३२ | ०४-१०-१९ | २३-३६-५१ |
| बुध | २३-३६-५१ | ०३-४३-१८ | ०३-२०-४९ १४-१२-१९४७रोजी |

अंदाजे जन्मवेळ दुपारी १२ ची असल्यामुळे ही मंगळ किंवा राहूच्या सबमध्ये येईल. परंतु मंगळ चंद्राचा नक्षत्रस्वामी आणि दिवसस्वामी म्हणून रुलिंगमध्ये आहे व राहू मात्र रुलिंगमध्ये नाही. म्हणून मंगळाचा सब निश्चित झाला. आता मंगळाच्या सबची सबसबमध्ये विभागणी करा.

| सब सब | सबसबची सुरुवात ता. : मि. : से. | सबसबची व्याप्ती ता. : मि. : से. | सबसबची शेवट ता. : मि. : से. |
|---|---|---|---|
| मंगळ | १०-२६-२२ | ००-०५-२३ | १०-३१-४५ |
| राहू | १०-३१-४५ | ००-१३-५० | १०-४५-३५ |
| गुरु | १०-४५-३५ | ००-१२-१८ | १०-५७-१३ |
| शनी | १०-५७-१३ | ००-१४-३६ | ११-१२-२९ |
| बुध | ११-१२-२९ | ००-१३-०४ | ११-२५-३३ |
| केतू | ११-२५-३३ | ००-०५-२३ | ११-३०-५६ |
| शुक्र | ११-३०-५६ | ००-१५-२२ | ११-४६-१८ |
| रवि | ११-४६-१८ | ००-०४-३७ | ११-५०-५५ |
| चंद्र | ११-५०-५५ | ००-०७-४१ | ११-५८-३६ |

येथे सबसब निश्चितीसाठी रुलिंग लग्नाची मदत घ्यावी लागेल. रुलिंग लग्नात चंद्र हा राशीस्वामी व सब म्हणून असल्यामुळे इतर ग्रहांपेक्षा बलवान आहे. म्हणून चंद्राचा सबसब नक्की केला. त्यानंतरचा बलवान ग्रह बुध (रुलिंग लग्नाचा नक्षत्रस्वामी व रुलिंग चंद्राचा राशी स्वामी) सबसबसब म्हणून घ्यावा लागेल.

रुलिंग चंद्रावरून चंद्राची स्थिती : गुरु-केतू-मंगळ-चंद्र-बुध अशी झाली.

बुधाच्या सबसबची विभागणी खालील कोष्टकाप्रमाणे :

| सब सब सब | सबसबसबचीसुरुवात ता.:मि.:से. | सबसबसबची व्याप्ती ता.:मि.:से. | सबसबसबचा शेवट ता.:मि.:से. |
|---|---|---|---|
| चंद्र | १०-५०-५५ | ००-००-३८ | ११-५१-३३ |
| मंगळ | ११-५१-३३ | ००-००-२७ | ११-५२-०० |
| राहू | ११-५२-०० | ००-०१-०९ | ११-५३-०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| गुरु | ११-५३-०९ | ००-०१-०१ | ११-५४-१० |
| शनी | ११-५४-१० | ००-०१-१३ | ११-५५-२३ |
| बुध | ११-५५-२३ | ००-०१-०५ | ११-५६-२८ |

बुधाच्या सबसबसबची सुरुवात आणि शेवटच्या वेळेचे लग्न पाहू.

११-५५-२३ या वेळेचे लग्न शनी-गुरु-शनी-राहू
११-५६-२८ या वेळेचे लग्न शनी-गुरु-शनी-गुरु

वरील लग्नाची रुलिंग चंद्राच्या स्थितीशी तुलना केल्यास दुसरा पर्याय जुळतो. हा गुरुचा सबसब ११-५५-४६ ला सुरु होतो आणि ११-५६-३९ ला संपतो. याचा मध्य घेतल्यास अचूक जन्मवेळ ११-५६-१२ अशी येते.

थोडक्यात जातकाची अचूक जन्मतारीख १३ डिसेंबर १९४४ व
अचूक जन्मवेळ दुपारी ११-५६-१२

उदाहरण नं. ५ : (लग्न संधीवर जन्म .... नक्की लग्न कोणते ?)

जन्मतारीख : २६ एप्रिल १९५४ जन्मस्थळ : ५२ उत्तर १६ - ९ पश्चिम ४३
अंदाजे जन्मवेळ : सकाळी ८.३० (जातकाच्या आईच्या सांगण्याप्रमाणे)

सकाळी ८.३० वाजताचे लग्न वृषभ २७°४४'१८'' शुक्र-मंगळ-गुरु-राहू
सकाळी ८.३० वाजता चंद्र मकर १३-४२-०२ शनी-चंद्र-राहू-चंद्र

जन्मशुद्धीचे काम १६ डिसेंबर २००७ रोजी १८-५३-३८ ला १२१ पश्चिम ५७.१५ : ३७ उत्तर २१.१५ (-८.००) हातात घेतले.

१८-५३-५८ चे रुलिंग लग्न मिथुन २८-४१-२३ बुध-गुरु-शुक्र-केतू
१८-५३-३८ चा रुलिंग चंद्र कुंभ २७-००-५६ शनी-गुरु-शुक्र-रवी

रवि युती बुध : गुरुची मंगळावर ७ वी दृष्टी

रुलिंग प्लॅनेटस्

| | | |
|---|---|---|
| लग्न नक्षत्र | पुनर्वसू | स्वामी गुरु |
| लग्न राशी | मिथुन | स्वामी बुध |
| चंद्र नक्षत्र | पूर्वा भाद्रपदा | स्वामी गुरु |
| चंद्र राशी | कुंभ | स्वामी शनी |
| दिवस | रविवार | स्वामी रवि |

वरील रुलिंग प्लॅनेटस् मध्ये शुक्र कुठेच नाही. परंतु बुध हा बलवान असून रविच्या युतीमुळे जास्त बलवान झाला आहे. त्यामुळे जातकाचे लग्न वृषभ नसून मिथुनच असले पाहिजे.

जन्मदिवशी वृषभ लग्न ०८.३८.४७ ला संपते व त्याचवेळी मिथुन लग्न सुरु होते. याचा अर्थ जातकाची लग्नवेळ ०८.३८.४७ नंतरची आहे.

आता प्रथम लग्नावरून चंद्राची स्थिती नक्की करू. जन्मवेळी चंद्र मकर राशीत श्रवण नक्षत्रात होता.



नक्षत्राचं देणं - वासंतिक २००८

जन्मतारीख बरोबर असल्यामुळे राशी व नक्षत्र स्थिती निश्चित झाली. चंद्र श्रवण नक्षत्रात २६ एप्रिल १९५४ रोजी ०१.४६.०० जातो आणि २७ एप्रिल ९.५४ ला ०१.४५.२४ पर्यंत होता जन्मवेळ या दरम्यान असल्यामुळे आपले काम आता सब आणि सबसब निश्चित करण्यापुरते मर्यादित झाले. श्रवण नक्षत्राची व्याप्ती २३ तास ५९ मिनिटे २४ सेकंद इतकी आहे. त्याची सबमध्ये विभागणी करू.

| सब | सबचीसुरुवात तास : मिनिटे :सेकंद | सबची व्याप्ती तास : मिनिटे :सेकंद | सबचा शेवट तास : मिनिटे :सेकंद |
|---|---|---|---|
| चंद्र | ०१-४६-०० | ०१-५९-५७ | ०२-४५-५७ |
| मंगळ | ०२-४५-५७ | ०१-२३-५८ | ०४-०९-५५ |
| राहू | ०४-०९-५५ | ०३-३५-५५ | ०७-४५-५० |
| गुरु | ०७-४५-५० | ०३-११-५५ | १०-५७-४५ |

अंदाजे जन्मवेळ ही गुरुच्या सबमध्ये येते. म्हणून पुढील सबची व्याप्ती काढण्याची गरज नाही. तसेच गुरु हा रुलिंग लग्नाचा नक्षत्रस्वामी असल्यामुळे गुरुचा सब निश्चित केला. तेव्हा आता त्याचे सबसब काढू. ते पुढील कोष्टकात दिले आहे.

| सब सब | सबसबचीसुरुवात तास : मिनिटे :सेकंद | सबसबची व्याप्ती तास : मिनिटे :सेकंद | सबसबचा शेवट तास : मिनिटे :सेकंद |
|---|---|---|---|
| गुरु | ०७-४५-५० | ००-२५-३५ | ०८-११-२५ |
| शनी | ०८-११-२५ | ००-३०-२३ | ०८-४१-४८ |
| बुध | ०८-४१-४८ | ००-२७-११ | ०९-०८-५९ |
| केतू | ०९-०८-५९ | ००-११-१२ | ०९-२०-११ |

वर बघितल्याप्रमाणे जातकाचा जन्म मिथुन लग्नात झाला आहे. मिथुन लग्न ०८-३८-४७ ला सुरु होते. त्यामुळे शनी, बुध किंवा केतू सबसब मध्ये जन्म असू शकतो. परंतु रुलिंग लग्नात शनी नाही म्हणून बुध किंवा केतू हे दोन पर्याय राहिले. बुध हा लग्न राशीस्वामी असल्याने बलवान आहे. शिवाय आपण जर लग्नाच्या सबसब केतूचा विचार केला तर केतू सिंहेत असल्यामुळे रवीचा एजंट होतो व रवी आणि बुध यांची युती आहे म्हणून बुधाचा सबसब निश्चित करायला हरकत नसावी.

थोडक्यात जन्म चंद्राची स्थिती शनी-चंद्र-गुरु-बुध अशी निश्चित केली. वरील कोष्टकानुसार पाहिल्यास बुधाचा सबसब ०८-४१-४८ हे ०९-०८-५९ पर्यंत आहे. या दोन्ही वेळचे लग्न काढून ते रुलिंग चंद्रावरून करेक्ट करू.

०८-४१-४८ चे लग्न मिथुन ० ४५ १६ बुध-मंगळ-बुध-रवी
०९-०८-५९ चे लग्न मिथुन ७ १४ ५९ बुध-राहू-राहू-शनी

रुलिंग चंद्रात राहू कोठेच नसल्यामुळे दुसरा पर्याय आपोआपच रद्द ठरतो. पहिल्या पर्यायात नक्षत्रस्वामी मंगळाला गुरु रिप्रेझेंट करतो. (गुरुची मंगळावर दृष्टी असल्यामुळे) व सब लॉर्ड बुधाला रवी रिप्रेझेंट करतो (रवी-बुध युतीमुळे). आता रुलिंग चंद्रातील सब शुक्राचा उपयोग करायचा तेवढा राहिला. तेव्हा शुक्र लग्नाचा सबसब लॉर्ड म्हणून घेऊ.

अशा तऱ्हेने लग्नाचे प्लॅनेटस् बुध-मंगळ-बुध-शुक्र असे निश्चित केले. हा शुक्राचा सबसब ०८-४०-१८ ला सुरु होतो व ०८-४१-३३ ला संपतो. या दोन्ही वेळांचा मध्य घेतल्यास बरोबर जन्मवेळ (सकाळी) ०८-४०-५५ येईल. हा लेख आदरणीय गुरुजी श्री. सुनील गोंधळेकर यांना अर्पण !